2019 - 2020
Category - III (1)
*

VOL. 5 | SPECIAL ISSUE 2| JULY-AUGUST 2019

Impact Factor: 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

09

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

*Chief Editor*
**Dr. Kalyan Gangarde**

*Issue Editors*
**Dr. Nandkumar Kumbharikar**

*Associate Editor*
**Dr. Dnyaneshwar Maske**

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*

**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**

*www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com*

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**Impact Factor:** 4.197 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies. A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor:*
**Dr Kalyan Gangarde,** Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal**, Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dr. Dashrath Kamble**, Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Dr. Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded
**Dr Rajiv Kumar,**
Associate Professor, Dept. of English, S.K.M University, Dumka, Jharkhand
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taiwan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

## EDITORIAL BOARD

**Dr Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Dr Ramkishan Bhise,** Assistant Professor, SIES Graduate School of Technology, Nerul, Navi Mumbai
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| Subscription Rates | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank **(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

## FROM THE EDITOR'S DESK .......

**WE** are delighted to present the Vol.5- Issue 4 of *Chronicle of Humanities & Cultural Studies* (CHCS) with valuable contributions from reknowned scholars of India. The journal is run by *'Centre for Humanities & Cultural Studies', Kalyan.* It is a brilliant off shoot of the Mahatma Gandhi Education & Welfare Society, Narwadi, Dist. Parbhani. It has been established with the mission to contribute to the education and welfare of the society to empower individuals for the better future.

We are confident that the issue will be useful for readers, critics and researchers. We are grateful to all our contributors for their responses.

We gratefully acknowledge the guidance and help received from various persons during the completion of this issue. We thank all the members of our advisory board and editorial board.

CHCS is a refereed journal, published bi monthly (Six issues in a year). In order to make *CHCS* self-sustaining, we need your support and patronage. As our well-wisher/friend/patron we urge you to enroll new members for the journal. In turn, we assure you that we will not compromise on quality in matters of content and production

Our next Issue will be published in October 2019. We hope you can make it successful with your valuable contributions.

We hope you enjoy this month's reading and as ever, if you have any questions or comments, please contact us at: cheskalyan@gmail.com .



## CONTENTS


| | | |
|---|---|---|
| 1. प्रमाण भाषा आणि बोली | डॉ.एम.बी. धोंडगे | 05 |
| 2. पंचायती राज-अधिकारी व पदाधिकारी संबंध | डॉ.गोविंद तु.यमलवाड | 08 |
| 3. पुर व्यवस्थापन एक आव्हाण | कं. एम. नागरगोजे | 10 |
| 4. महाराष्ट्रातील लुप्त होत चाललेल्या ग्रामीण क्रिडाप्रकारांचा अभ्यास | डॉ.पी.एल.कराड | 12 |
| 5. बीड जिल्ह्यातील प्राचीन मंदिराचे ऐतिहासिक महत्व–एक अभ्यास | प्रा. साळवे एस.आर | 14 |
| 6. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिला लोकप्रतिनिधींचे स्थान | डॉ .भारत भो.राठोड | 16 |
| 7. मध्ययुगीन काळातील नगर जलव्यवस्थापनाचा भौगोलिक अभ्यास | डॉ.डोके.ए.टी. | 17 |
| 8. बीड जिल्ह्यातील नगरपरिषदांचा प्रशासकीय अभ्यास | अनंत आश्रुबा मुंडे | 19 |
| 9. महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळ : एक अवलोकन | ज्ञानेश्वर बी. मस्के | 21 |
| 10. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्क्रांतीचा राजकीय अभ्यास | डॉ.चंद्रशेखर का.तळेकर | 23 |
| 11. महाराष्ट्रातील पोलीस प्रशासनाच्या वैशिष्ट्यांचा प्रशासकीय अभ्यास | डॉ. ए.एल.गोरे | 25 |
| 12. महाराष्ट्रातील साखर उद्योग आणि उत्पादनाचा अभ्यास | डॉ.मधुकर आघाव | 27 |
| 13. महाराष्ट्रातील नगर परिषदांच्या रचना व कार्याचा प्रशासकीय अभ्यास | डॉ.पी.एल.चव्हाण | 29 |
| 14. मानवी अधिकार आणि शैक्षणिक हक्क : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. एस. डी. परळकर | 31 |
| 15. भारतीय संविधानातील केंद्र–राज्य प्रशासकीय संबंधविषयक तरतूदींचे ... | डॉ.व्यंकट विळेगावे | 33 |
| 16. जायकवाडी प्रकल्प : जलसाठा व नियोजनाचा अभ्यास | प्रो.पाटील के. के.<br>पाटील चारुशिला विजयराव | 35 |
| 17. महाराष्ट्रातील लोककलांच्या प्रकाराचा अभ्यास | प्रा.रुक्मीणीकांत पांडव | 37 |
| 18. आण्विक सामर्थ्यशाली भारत : एक अभ्यास | सोनवणे जी.एन. | 39 |
| 19. महाराष्ट्राचे हवामान : परिणामकारक घटकांचा भौगोलिक अभ्यास | झिंजुर्डे दयानंद वामनराव | 41 |
| 20. भारताच्या सांसदीय शासनप्रणालीतील पंतप्रधान कार्यालयाची भूमिका... | डॉ.नंदकुमार कुंभारीकर | 43 |
| 21. १९७० च्या दशकातील दलित स्वकथनाचे स्वरुप | डॉ.सुरेश व्यंकटराव कदम | 45 |
| 22. मीरा कांत कृत 'नेपथ्यराग' और स्त्री विमर्श | डॉ. एन.जी. एमेकर | 49 |
| 23. प्रेमचंद क उपन्यासों मे सामाजिक वदलाव का अध्ययन | महमंद रौफ इब्राहीम | 50 |
| 24. डॉ.लक्ष्मीनारायण लाल कृत 'मिस्टर अभिमन्यु' : भ्रष्टाचारी व्यवस्था... | श्रीमती हेमा एस. सुल्तानपुरे | 52 |
| 25. 'तीन अकेले साथ–साथ' : सदियों से संघर्षरत नारी की वेदना | डॉ.श्रीदेवी बाबुराव बिरादार | 54 |
| 26. भारतातील साठ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या लोकसंख्येचा कालसापेक्ष अभ्यास | डॉ. दयानंद उजळंबे | 56 |

26.

# भारतातील साठ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या लोकसंख्येचा कालसापेक्ष अभ्यास

**प्रा.डॉ. दयानंद उजळंबे**
उपप्राचार्य, तथा भूगोल विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड. जि.परभणी.

**सारांश :** प्रस्तूत शोधनिबंधामध्ये भारतातील साठ वर्षांपेक्षा अधिक लोकसंख्या १९६१ ते २०११ दरम्यान कशी वाढत गेलेली आहे. आर्यूमानात वाढ, आरोग्याच्या सुविधा, शासकीय योजना, वृद्धाश्रम, जेष्ठ नागरिकासाठी वेगवेगळ्या योजनेमुळे लोकसंख्या वाढलेली दिसून येते. प्रस्तूत शोधनिबंधामध्ये ६० वर्षांपेक्षा अधिक एकूण लोकसंख्या, ग्रामीण लोकसंख्या आणि शहरी लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास केला असून ग्रामीण आणि शहरी नागरिकांना शासकीय सुविधा, सामाजिक दर्जा, पेन्शन, सन्मान, सामाजिक आधार कशा पद्धतीने देता येईल हे प्राप्त आकडेवारीवरुन समजू शकते. ग्रामीण भागातही ६० वर्षांपेक्षा अधिक वय झालेल्या शेतकऱ्यांना शेतकरी सन्मान पेन्शन योजना कशा पद्धतीने लागू करता येईल, आरोग्य आहार, मनोरंजन, मानसिक संतुलनही दिल्यास जेष्ठ नागरिक सन्मानाने जगू शकतात. त्याचबरोबर आर्यूमानात वाढ झाल्यामुळे त्या-त्या क्षेत्रातील काही टक्के कार्यकारी लोकसंख्याही यातून प्राप्त होऊ शकते. प्रस्तूत शोधनिबंधाचा हा प्रमुख उद्देश आहे.

**बीजसंज्ञा:** जेष्ठ नागरिक, ६० वर्ष वयोगटापेक्षा अधिकची स्त्री-पुरुष लोकसंख्या.

**अ) प्रस्तावना :**

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये ६० वर्षांपेक्षा अधिक लोकसंख्येचा, स्त्री-पुरुषाचा, ग्रामीण-शहरी लोकसंख्येचा अभ्यास असून १९६१ ते २०११ दरम्यान ६० वर्ष वयोगटातील लोकसंख्येत जो बदल झालेला आहे त्याचा अभ्यास असून अशाच पद्धतीने लोकसंख्या वाढत राहिली तर भविष्यातील लोकसंख्या वाढ कशा पद्धतीची असेल या वयोगटात वाढत जाणाऱ्या लोकसंख्येमुळे साधनसंपत्तीवर वाढत जाणारा ताण कमी करण्यासाठी यातील काही टक्के लोकसंख्या कार्यकारी करुन त्यांच्या अनुभवाचा फायदा त्या-त्या क्षेत्रात घेता येवू शकतो. या सोबतच त्यांना त्यांच्या प्राथमिक गरजा आरोग्य, आहार, निवारा, पेन्शन, जेष्ठ नागरिकासाठी क्रीडा संकूल, व्यायाम शाळा, मानसिक आधारकेंद्र किती प्रमाणात तयार करावी लागतील हे प्राप्त आकडेवारीवरुन समजू शकते. प्रशासनाला अशा पद्धतीच्या आकडेवारीमुळे पुढील धोरणेही ठरविता येतात. प्रस्तूत शोधनिबंधाचा हाच महत्त्वाचा उद्देश आहे.

**ब) उद्दीष्ट्ये :**

१) भारतातील ६० वर्षांपेक्षा अधिक लोकसंख्येत जो बदल इ ाला त्याचा अभ्यास करणे.

२) भारतातील वाढत जाणाऱ्या जेष्ठ नागरिकांना कोणत्या पद्धतीने सेवा प्रदान करता येतील त्यांचा अभ्यास करणे.

**क) क्षेत्रनिवड आणि अभ्यास पद्धती :** प्रस्तूत शोधनिबंधामध्ये भारतातील साठ वर्ष व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या अभ्यासण्यासाठी भारतीय जनगणना २०११ चा आधार घेतला असून प्रस्तूत जनगणनेमधील घेतलेली आकडेवारी दुय्यम स्वरुपाची असून १९६१ ते २०११ मधील ६० वर्षांपेक्षा अधिकच्या एकूण स्त्री, पुरुष, ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येत जो बदल झालेला आहे तो सांख्यकीय पद्धतीने दार्खविला असून प्रस्तूत आकडेवारीचे पृथःकरण करुन कोणत्या जनगणनेमध्ये अति तिव्र बदल झालेले आहेत. त्याचा भविष्यातील लोकसंख्येवर काय परिणाम होईल, शासकिय सेवा-सुविधांवर काय परिणाम होईल या संदर्भात माहिती असून आलेखीय पद्धतीने ते दार्खविले आहे. प्रस्तूत शोध निबंधासाठी वेगवेगळ्या संकेतस्थळाचा उपयोगही करण्यात आलेला आहे.

**ड) विषय विवेचन :**

सारणी क्र.०१ नुसार भारतातील साठ वर्ष वयोगटापेक्षा जास्त लोकसंख्येचा दशर्कानिहाय अभ्यास केला असता १९६१ मध्ये एकूण ५.६३% लोकसंख्या अस्तीत्वात होती ती वाढत जाऊन २०११ मध्ये ८.५८% लोकसंख्या झाली असून २.९५% नी वाढ मागील पाच दशकामध्ये झाली असून पुरुष लोकसंख्या १९६१ मध्ये ५.४६% होती. त्यात वाढ होऊन ८.२०% झाली.

**सारणी क्र.१**


**भारतातील साठ वर्षांपेक्षा अधिकची लोकसंख्या % मध्ये**

| वर्ष | एकूण लोकसंख्या | पुरुष लोकसंख्या | स्त्री लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १९६१ | ५.६३ | ५.४६ | ५.८० |
| १९७१ | ५.९७ | ५.३४ | ५.९९ |
| १९८१ (*) | ६.४९ | ६.४० | ६.५८ |
| १९९१(*) | ६.७६ | ६.५५ | ६.७७ |
| २००१ (+) | ७.४५ | ७.१० | ७.८३ |
| २०११ | ८.५८ | ८.२० | ८.९८ |

Source : Office of the register & census commissioner, India.

Graph No.1

Above sixty age population in India Population in(%)



१९६१ ते २०११ दरम्यान पुरुष लोकसंख्येत २.७४% नी वाढ झालेली आहे तर स्त्री लोकसंख्येबाबत १९६१ मध्ये ५.८०% लोकसंख्या होती जी पुरुष आणि सरासरी लोकसंख्येपेक्षा जास्त होती पुढील पाच दशकात म्हणजे २०११ मध्ये ८.९८% लोकसंख्या झाली. १९६१ ते २०११ दरम्यान स्त्री लोकसंख्येत ३.१८% नी वाढ झाली आहे. एकंदरीत भारतातील ६० वर्षांपेक्षा अधिक लोकसंख्येचा अभ्यास केला असता पुरुषापेक्षा स्त्री लोकसंख्येचे प्रमाण अधिक दिसून येते. याचाच अर्थ पुरुषाचा मृत्यूदर अधिक असून स्त्री मृत्यूदर कमी आहे.

**सारणी क्र.०२**

**भारतातील साठ वर्षांपेक्षा अधिकची ग्रामीण लोकसंख्या % मध्ये**

| वर्ष | एकूण लोकसंख्या | पुरुष लोकसंख्या | स्त्री लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १९६१ | ५.८२ | ५.७ | ५.९४ |
| १९७१ | ६.२१ | ६.२६ | ६.१७ |
| १९८१ (*) | ६.८४ | ६.८३ | ६.८५ |
| १९९१(*) | ७.११ | ७.१७ | ७.०५ |
| २००१ (+) | ७.७४ | ७.४३ | ८.०६ |
| २०११ | ८.७९ | ८.४२ | ९.१९ |

Source : Office of the register & census commissioner, India.

सारणी क्र.०२ नुसार ६० वर्षांपेक्षा अधिक ग्रामीण भारतातील लोकसंख्येचा अभ्यास केला असता १९६१ मध्ये ५.८२% लोकसंख्या होती त्यात वाढ होऊन ८.७९% झाली १९६१ ते २०११ दरम्यान २.९७% ची वाढ झाली असून पुरुष लोकसंख्या १९६१ मध्ये ५.७% होती ती २०११ मध्ये ८.४२% होऊन १९६१ ते २०११ दरम्यान २.७२% नी वाढ झालेली आहे. तर स्त्री लोकसंख्येचा अभ्यास केला असता १९६१ मध्ये ६० वर्षांपेक्षा अधिक ग्रामीण स्त्री लोकसंख्येत ३.२५% वाढ झाली, ग्रामीण भागातही पुरुष लोकसंख्येपेक्षा स्त्री लोकसंख्येचे प्रमाण अधिक असून २०११ मध्ये पुरुषापेक्षा स्त्री लोकसंख्येचे प्रमाण ०.७७% अधिक आहे.

**सारणी क्र.०३**

**भारतातील ६० वर्ष वयोगटापेक्षा जास्त शहरी लोकसंख्या % मध्ये**

| वर्ष | एकूण लोकसंख्या | पुरुष लोकसंख्या | स्त्री लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १९६१ | ४.७४ | ४.४२ | ५.११ |
| १९७१ | ४.९७ | ४.७३ | ५.२६ |
| १९८१ (*) | ५.३६ | ५.०८ | ५.६९ |
| १९९१(*) | ५.७५ | ५.५५ | ५.९६ |
| २००१ (+) | ६.७० | ६.२५ | ७.२१ |
| २०११ | ८.१० | ७.७१ | ८.५२ |

Source : Office of the register & census commissioner, India.

* Excludes Assam

**Excludes Jummu & Kashmir

+ Excludes ३ sub-division of Senapati district of Manipur.

Note : (This Informationi Alloted all table; this research paper)

सारणी क्र.०३ नुसार भारतात ६० वर्षांपेक्षा अधिक नागरी लोकसंख्येचे प्रमाण १९६१ मध्ये ४.७४% होते तर २०११ मध्ये ती कमालीची वाढून ८.१०% टक्क्यावर आलेली असून १९६१ ते २०११ मध्ये ३.३६% नी वाढ झाली असून ग्रामीण भागापेक्षा २०११ चा ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येचा अभ्यास केला असता ग्रामीण लोकसंख्येपेक्षा शहरी लोकसंख्येच्या प्रमाणात ०.६९% नी वाढ झालेली आहे. विशेष म्हणजे १९६१ मध्ये ग्रामीण लोकसंख्या ५.८२% तर शहरी लोकसंख्या त्याहीपेक्षा कमी म्हणजे ४.७४% होती. परंतु नागरिकरणाचा वेग वाढल्यामुळे शहरी लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. शहरी भागातील पुरुष लोकसंख्या १९६१ मध्ये ४.४२% होती तर २०११ मध्ये ७.७१% झाली तर स्त्री लोकसंख्या १९६१ मध्ये ५.११% तर २०११ मध्ये ८.५२% होती. शहरी लोकसंख्येमध्ये पुरुषापेक्षा स्त्री लोकसंख्येचे प्रमाण अधिक असून १९६१ मध्ये ०.६९% तर २०११ मध्ये त्यात वाढ होऊन १.०१% झाली आहे. शहरी भागात ६० वर्ष वयोगटापेक्षा जास्त पुरुषापेक्षा स्त्री लोकसंख्येचे प्रमाण अधिक असून शहरी भागात स्त्रियांना मिळत असलेला रोजगार, साक्षरता राहणीमानाचा दर्जा, स्त्री मृत्युदराचे प्रमाण हे मुख्य कारण सांगता येतील.

**इ) निष्कर्ष :**

१) भारतात ६० वर्ष वयोगटापेक्षा जास्त लोकसंख्येचा अभ्यास केला असता १९६१ आणि २०११ दरम्यान २.९५% वाढ झाली असून या वयोगटात पुरुषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे.

२) ६० वर्ष वयोगटापेक्षा जास्त ग्रामीण लोकसंख्येचा अभ्यास केला असता १९६१ मध्ये शहरी भागापेक्षा ग्रामीण लोकसंख्या अधिकची आहे. मात्र शहरी भागापेक्षा ग्रामीण स्त्रियांचे प्रमाण १९६१ आणि २०११ मध्येही अधिक आढळते.

३) ग्रामीण आणि शहरी भागातही स्त्री लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे.

**ई) उपाय-योजना :**६० वर्ष वयोगटापेक्षा अधिक जेष्ठ नागरिकांचा १९६१ ते २०११ दरम्यान सांख्यकीय आकडेवारीवरुन लोकसंख्या २.९५% नी वाढलेली आहे. तर स्त्री लोकसंख्या ग्रामीण आणि शहरी भागात पुरुषाच्या तुलनेमध्ये अधिक असल्यामुळे स्त्रियांना आरोग्याच्या सुविधा. मनोरंजनाच्या सुविधा, मानसिक आधार केंद्र, मानधन योजना कार्यान्वित करणे गरजेचे असून १९६१ च्या तुलनेत २०११ मध्ये एकूण पुरुषाची ही लोकसंख्या वाढली असल्यामुळे जेष्ठ नागरिकांना सामाजिक, आर्थिक, मानसिक आधार देण्यासाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजना कार्यान्वित होणे गरजेचे असून शेतकऱ्यांना पेन्शन योजनेची तरतूद करणे गरजेचे आहे. या संदर्भात वेगवेगळे कायदे, धोरणे, कार्यक्रम आणि त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

१. www.https://vikaspedia.in
२. www.https://censusindia.gov.in
3. www.https://mospi.nic.in